**L. A. BILL No. XV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION ACT, 1997.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५.**

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९९७ चा महा. ३८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या दीर्घ शीर्षाची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे), याच्या दीर्घ शीर्षामध्ये " राज्य मंडळाची स्थापना करण्याची " या मजकुरानंतर, " आणि तंत्रनिकेतन किंवा संस्था व त्यातील अभ्यास पाठ्यक्रम यांचे उक्त मंडळाशी संलग्नीकरण करण्याशी संबंधित बाबींची " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

१९९७ चा महा. ३८.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या उद्देशिकेची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमांच्या उद्देशिकेतील " राज्य मंडळाची स्थापना करण्यासाठी " या मजकुरानंतर, " आणि तंत्रनिकेतन किंवा संस्था व त्यातील अभ्यास पाठ्यक्रम यांचे उक्त मंडळाशी संलग्नीकरण करण्याशी संबंधित बाबींसाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(क) खंड (अ) च्या अगोदर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ-१) " संलग्न संस्था " म्हणजे मंडळाकडून संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आलेली संस्था ; " ;

(ख) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (अअ) " स्वायत्तता " म्हणजे, पदविका स्तरीय तंत्र शिक्षणाशी संबंधित शैक्षणिक अध्ययनक्रम चालविणे आणि परीक्षा आयोजित करणे, त्या त्या विषयांसाठी पाठ्यक्रम तयार करणे आणि परीक्षा उत्तीर्ण झाल्याची प्रमाणपत्रे देणे यांसाठी परवानगी देण्यासाठी, संस्थेला प्रदान केलेला मंडळाचा विशेषाधिकार आहे ;

(अब) " स्वायत्त संस्था " म्हणजे, कलम ३३ अन्वये स्वायत्तता प्रदान केलेली संस्था ; " ;

(ग) खंड (ड) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ड) " पदविका स्तरीय तंत्र शिक्षण " म्हणजे, पदविका किंवा पदविकोत्तर किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका स्तरीय अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र किंवा व्यवस्थापन शिक्षण संपादन करण्यासाठी, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अभियांत्रिकी किंवा, यथास्थिति, तंत्रशास्त्र पदविका यांच्या नंतरचे असेल असे तंत्र शिक्षण किंवा मंडळाने विनिर्दिष्ट केलेले कोणतेही अन्य शिक्षण.

**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनार्थ, " तंत्र शिक्षण " या शब्दप्रयोगामध्ये, नियामक प्राधिकरणाने घोषित केलेला अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, नगररचना, व्यवस्थापन, औषधनिर्माण शास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रशास्त्रामधील पदविका स्तरीय शैक्षणिक अध्ययनक्रमाचादेखील अंतर्भाव आहे ; " ;

(घ) खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (गअ) " व्यवस्थापन " म्हणजे, ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एक किंवा अधिक संस्था चालविण्यात येत आहेत आणि ज्यांना मंडळाचे विशेषाधिकार प्रदान केले आहेत, अशा महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही विश्वस्त मंडळाचे किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या, कोणत्याही संस्थेचे किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम ८ अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कंपनीचे, विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ,—मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो ; " ;

१९५० चा २९.
१८६० चा २१.
२०१३ चा १८.

(ङ) खंड (जे) मध्ये, " तीन प्रदेशांतील " या मजकुराऐवजी " प्रदेशांतील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(च) खंड (जे) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (जे-अ) " प्रादेशिक कार्यालय " म्हणजे, संबंधित प्रदेशाकरिता राज्य शासनाने स्थापन केलेले एक कार्यालय ; " ;

(छ) खंड (के) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (केअ) " नियामक प्राधिकरण " म्हणजे, संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा तदन्वये स्थापन केलेले असे कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय ज्यांची, पदविका स्तरीय तंत्र शिक्षण संस्था किंवा पाठ्यक्रम सुरू करण्यासाठी, मान्यता आवश्यक आहे आणि ज्याला, तत्संबंधित बाबींचे नियमन करण्यासाठी प्राधिकृत केले आहे आणि त्यात मंडळाचा अंतर्भाव आहे ; " .

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ मध्ये कलम ४अ समाविष्ट करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

मंडळाची उद्दिष्टे.

" **४अ.** अध्यापन, संशोधन, विस्तार व सेवा यांद्वारे ज्ञान व सामंजस्य यांचा प्रसार, निर्मिती व जपणूक करणे, ही मंडळाची सर्वसाधारण उद्दिष्टे असतील आणि विशेषतः ही उद्दिष्टे, पुढीलप्रमाणे असतील,—

(१) पदविका स्तरीय तंत्र शिक्षण कार्यक्रमांचा विकास करण्याकरिता पर्यवेक्षण करणे, संनियंत्रण करणे, नियमन करणे व योगदान देणे ;

(२) मंडळ निर्धारित करील अशा शर्तींना अधीन राहून, परीक्षांचे आयोजन करणे आणि पदविका व इतर शैक्षणिक विशेषोपाध्या व उपाध्या प्रदान करणे, आणि विहित रीतीने अशा कोणत्याही पदविका किंवा इतर शैक्षणिक विशेषोपाध्या किंवा उपाध्या काढून घेणे किंवा रद्द करणे ;

(३) सूचना, प्रशिक्षण, संशोधन, विकास व विस्तार आणि मंडळास योग्य वाटतील अशी इतर साधने यांद्वारे पदविका स्तरीय तंत्र शिक्षणाच्या विकासासाठी सुविधा पुरविणे व संधी उपलब्ध करून देणे ;

(४) दीर्घकालीन आवश्यकतांशी सुसंगत असणारा आणि अपेक्षित परिवर्तने व विकास यांना प्रतिसाद देणारा आणि समाजाच्या विद्यमान गरजांशी सुसंबद्ध असणारा पदविका स्तरीय तंत्र शिक्षणाचा कार्यक्रम तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे ;

(५) पदविका स्तरीय तंत्र शिक्षणामध्ये ज्ञानाच्या अभिवृद्धीना चालना देणे आणि समाजाच्या उध्दारासाठी त्याचा प्रसार करणे ;

(६) एकीकडे शैक्षणिक संस्था व संशोधक समुदाय आणि दुसरीकडे उद्योग व शासकीय नियोक्ता यांच्यामध्ये सहकार्य व कल्पनांचे आदानप्रदान करण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेचे प्रचालन करण्यासाठी एक केंद्र म्हणून सेवा बजावणे ;

(७) अध्ययनशील समाजासाठी पदविका स्तरीय तंत्र शिक्षणाच्या सुविधांचे समन्यायी वितरण आणि आधुनिक संपर्क माध्यमे व तंत्रज्ञान यांच्या उचित वापरासह पदविका शैक्षणिक जाळे विकसित करण्यासाठी, त्याचे प्रचालन करणे ;

(८) कार्यक्षम व संवेदनशील प्रशासन, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन यांची तरतूद करणे आणि अध्यापन, संशोधन व विस्तार व्यवस्थेचा विकास करणे ;

(९) विद्याविषयक उपक्रम व सहयोगी अध्ययनक्रम यांच्याद्वारे आर्थिक स्वयं-निर्भरता निर्माण करणे ;

(१०) विविध राज्य प्राधिकरणे व संस्था यांच्यामध्ये अधिक चांगल्या प्रकारे परस्परसंवाद व समन्वय साधण्यास प्रोत्साहन देणे ;

(११) विद्यार्थ्यांशी संबंधित सर्व शैक्षणिक आणि इतर बाबींमध्ये एकमेव मार्गदर्शक निकष म्हणून स्पर्धात्मक गुणवत्तेला आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी काटेकोर प्रयत्न करणे ;

(१२) उद्योगाच्या गरजा भागविण्यासाठी आणि तंत्रज्ञानामध्ये अभिवृद्धीचा समावेश करण्यासाठी अभ्यासक्रम विकसित किंवा सुधारित करणे ;

(१३) शिक्षणक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीची योजना तयार करणे आणि आवश्यक अध्ययन संसाधने विकसित करणे व अध्यापकांना समुचित प्रशिक्षण देणे ;

(१४) शैक्षणिक अभ्यासक्रम, इतर उपक्रम राबविणे आणि अध्यापन व संशोधन करणे आणि दर्जेदार निरंतर अभ्यासक्रम प्रस्तावित करणे ;

(१५) पदविका स्तरीय तंत्र शिक्षणात आणि त्यांच्या आंतर-विद्याशाखीय अभ्यासक्रमांत अध्ययन, अध्यापन, क्षमता व कौशल्ये विकासाची तरतूद करणे ;

(१६) तंत्र शिक्षणाकरिता सूचना, अध्यापन व प्रशिक्षण देणे आणि संशोधनासाठी तरतुदी करणे ;

(१७) पदविका स्तरीय तंत्र शिक्षणाचे बळकटीकरण करण्यासाठी व नवोपक्रमांसाठी उत्कृष्टता केंद्रे निर्माण करणे ;

(१८) नाविन्यपूर्ण दृष्टीकोनांसह नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये तंत्रशिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रम सुरू करणे ;

(१९) सर्जनशीलता आणि उद्योजकता विकसित करण्यासाठी आणि त्याची जोपासना करण्यासाठी शैक्षणिक संरचनेमध्ये सहजता निर्माण करणे, अध्ययनाच्या कालमर्यादा आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रक्रियांसाठी नाविन्यपूर्ण दृष्टीकोन स्थापित करणे ;

(२०) विशिष्ट क्षेत्रांमध्ये किंवा उद्योगाच्या गरजांमध्ये निरंतर शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्थांना प्रोत्साहन देणे किंवा मार्गदर्शन करणे ;

(२१) कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा त्याच्याशी संबंधित हक्क संपादन करणे, धारण करणे, हस्तांतरण करणे आणि निकालात काढणे आणि परिणामकारक कार्यशीलतेसाठी त्याची व्यवस्था पाहणे व त्याच्याशी संबंधित कार्यवाही करणे ; आणि

(२२) देशातील किंवा देशाबाहेरील संलग्न संस्था, परीक्षा मंडळे, विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक मंडळे, संचालनालये आणि शासकीय विभाग इत्यादींसाठी तसेच तंत्र शिक्षण उपक्रमांच्या उन्नतीसाठी सल्लागार, संलग्नता आणि आधार सेवा पुरविणे व संपादित करणे. ”.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— 

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ५ ची सुधारणा.

(क) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ-१) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, सदस्य ; ".

(ख) खंड (ब) मध्ये, " संचालक " या मजकुराऐवजी, " सचिव " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (क) मध्ये,—

(एक) " **वर्ग अ-पदसिद्ध सदस्य** " या शीर्षाखालील,—

(१) उप-खंड (तीन) वगळण्यात येईल ;

(२) उप-खंड (पाच) मधील, " मनुष्यबळ विकास मंत्रालय " या मजकुराऐवजी, " शिक्षण मंत्रालय " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " **वर्ग ब-नामनिर्देशित सदस्य** " या शीर्षाखालील,—

(१) उप-खंड (चार) वगळण्यात येईल ;

(२) उप-खंड (पाच) ऐवजी, पुढील उपखंड दाखल करण्यात येईल :—

" (पाच) शासनाने, तंत्र शिक्षणाशी संबंधित नोंदणीकृत औद्योगिक संघ किंवा व्यावसायिक संस्था यांच्या पदाधिकाऱ्यांमधून त्यांनी शिफारस केलेल्या पदाधिकाऱ्यांमधून, नामनिर्देशित करावयाचे सहा सदस्य : " .

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मधील, पोट-कलम (१) मधील "किंवा त्याच्याशी समतुल्य पदाचा" हा मजकूर वगळण्यात यईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये,—

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २० ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मधील "अध्यक्षाच्या" या मजकुराऐवजी, "संचालकाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (७) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(८) सचिव, मंडळाचा अभिलेख, सामायिक मोहोर आणि अशा इतर मालमत्ता यांचा अभिरक्षक असेल.

(९) सचिव, या अधिनियमान्वये तयार केलेल्या उपविधींचे व विनियमांचे निदेशपुस्तक, वेळोवेळी, तयार करील व अद्ययावत करील.

(१०) सचिव, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(११) सचिवास, प्राधिकरणांच्या व त्यांच्या समित्यांच्या निर्णयांना अधीन राहून, मंडळाच्या वतीने करार करण्याचा, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याचा व अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये, —

(क) खंड (ज्ञज) मधील, उपखंड (तीन) वगळण्यात येईल ;

(ख) खंड (ज्ञम) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ज्ञन) शासकीय तंत्र निकेतनची मागील कामगिरी विचारात घेऊन, अशा संस्थेची आदर्श तंत्रनिकेतन किंवा उत्कृष्टता केंद्र म्हणून श्रेणीवाढ करणे. " .

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २३ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मधील, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

" (१अ) संचालक, शासनाद्वारे व नियामक परिषदेद्वारे दिलेल्या निदेशांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे किंवा, यथास्थिति, अंमलबजावणी केली जात आहे, याची सुनिश्चिती करील.

(१ब) जेव्हा कोणतीही बाब, विनियम किंवा उपविधी यांद्वारे विनियमित करावयाची असेल, परंतु त्याबाबतीत कोणतेही विनियम किंवा उपविधी केलेले नसतील, तेव्हा संचालक, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देऊन ती बाब, त्या वेळेपुरती विनियमित करू शकेल, आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर, पुढील बैठकीत, मान्यतेसाठी मंडळापुढे ठेवील :

परंतु, असे निदेश, ते दिल्यापासून सहा महिन्यांच्या आत, विनियम किंवा, यथास्थिति, उपविधी यात रुपांतरित करणे आवश्यक असेल, असे करण्यात कसूर केल्यास, असे निदेश आपोआप व्यपगत होतील, परंतु त्याद्वारे केलेल्या कार्यवाहीवर परिणाम होणार नाही.

(१क) पोट-कलमे (१) व (१अ) अन्वये अभिप्रेत असलेल्या कर्तव्यांच्या प्रयोजनार्थ, संचालकास त्याची अशी कर्तव्ये पार पाडण्याचे अधिकार, सचिवाला किंवा त्याला योग्य वाटेल अशा इतर अधिकाऱ्यास सोपविता येतील.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ यामध्ये कलम २४अ समाविष्ट करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

फी निश्चिती समिती.

**" २४अ.** (१) राज्य शासन आदेशाद्वारे, विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतन किंवा मंडळाशी संलग्न संस्था यांद्वारे चालविण्यात येणाऱ्या प्रत्येक पदविका स्तरीय तंत्र शिक्षण देण्याचा प्रत्यक्ष खर्च ठरविण्यासाठी, एक फी निश्चिती समिती घटित करील. शासन, अशा आदेशामध्ये फी निश्चिती समितीचा अध्यक्ष व सदस्य यांच्या वित्तलब्धी व इतर देय भत्ते, पदावधी व सेवेच्या शर्ती विनिर्दिष्ट करील.

(२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ याच्या कलमे १३, १४ व १५ मध्ये तरतूद केलेली शुल्क नियामक प्राधिकरणाची कार्ये, अधिकार व कार्यपद्धती, शुल्क नियामक प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती आणि शुल्क संरचनेचे निर्धारण करण्यासाठीचे घटक, पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या फी निश्चिती समितीद्वारे असे प्रत्येक शिक्षण देण्याचा वास्तव खर्च ठरविताना, योग्य त्या फेरफारांसह, अनुसरण्यात येतील.". २०१५ चा महा. २८.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २५ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ मधील,—

(क) पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (फ) मधील, "मंडळाने" या मजकुराऐवजी, "मंडळाने व नियामक प्राधिकरणाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ह) मधील, "अध्यक्ष" या मजकुराऐवजी, "मंडळाचा संचालक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (आय) मधील, "मंडळाच्या" या मजकुराऐवजी, "शासनाच्या व समुचित नियामक प्राधिकरणाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) खंड (ज) मधील, "मंडळाच्या" या मजकुराऐवजी, "शासनाच्या व नियामक प्राधिकरणाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (२) दुसऱ्या प्राधिकरणाचा, मंडळाचा किंवा विद्यापीठाचा भाग असलेल्या संस्थेचे संलग्नीकरण, त्या प्राधिकरणाकडून, मंडळाकडून किंवा विद्यापीठाकडून " ना हरकत प्रमाणपत्र " मिळाल्याशिवाय केले जाणार नाही :

परंतु, मंडळाकडून किंवा महाराष्ट्र शासनाकडून कोणत्याही स्वरूपाचे वित्तीय सहाय्य मिळावे, असा दावा, अशा संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून केला जाणार नाही आणि मंडळ किंवा महाराष्ट्र शासन, अशा विद्यार्थ्यांना कोणतेही वित्तीय सहाय्य देण्यास उत्तरदायी असणार नाही.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २६ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मधील,—

(क) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (३) नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी मंडळाद्वारे घोषित केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार मंडळाच्या सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील." ;

(ख) पोट-कलम (४) मधील, " त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी " या मजकुराऐवजी, " उक्त वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (५) मंडळाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनास, मंडळाकडून अशी शिफारस प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता, तंत्र शिक्षणाच्या परिसंस्थांच्या ठिकाणासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम आणि राज्य आणि केंद्र सरकारची धोरणे विचारात घेऊन, त्याच्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार योग्य व उचित वाटेल त्याप्रमाणे अशा संस्थांना, परवानगी देता येईल. राज्य शासनाकडून मंडळाला, अशा मान्यतेविषयी कळविण्यात येईल. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानंतर दिलेल्या मान्यता ह्या, मंडळाकडून केवळ त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षात अंमलात आणल्या जातील :

परंतु, अपवादात्मक परिस्थितीमध्ये व कारणे लेखी नमूद करून, तंत्र शिक्षणाच्या नवीन संस्था सुरू करण्यासाठी, मंडळाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जास, शासनाकडून मान्यता देता येईल. " ;

(घ) पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (५अ) या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषय, जादा तुकड्या सुरू करणे, नावात बदल आणि ठिकाणात बदल अशा परवानगीकरिता योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात येईल.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, " कलम २६ अन्वये शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर " या मजकुरानंतर, " शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर आणि आवश्यक असेल तेथे नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (५) वगळण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३२ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मधील, " तीस दिवसांपेक्षा " या मजकुराऐवजी, " पंधरा दिवसांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (४) मंडळ, संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन, शासनाकडे, संलग्नतेच्या निलंबनाची कार्यवाही किंवा संलग्नता काढून घेणे किंवा या बाबतीत करावयाच्या इतर कोणत्याही योग्य कार्यवाहीची (दंडाची शिक्षा लादण्यासह) शिफारस करील आणि त्यांनतर शासन, त्या शिफारशींची अंमलबजावणी करील.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या, कलम ३३ मधील, पोट-कलम (३) मध्ये, " प्रमाणकानुसार सुविधा अस्तित्वात आहेत " या मजकुरानंतर, " संस्थेने किमान आवश्यक अधिस्वीकृती मिळविली आहे आणि त्यांच्याकडे पुरेशी आर्थिक क्षमता आहे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मधील, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (४अ) स्वायत्त दर्जा प्राप्त झालेली संस्था मूल्यांकन करील, निकाल घोषित करील आणि वेगवेगळ्या अध्ययनक्रमांसाठी संयुक्त-प्रमाणपत्र किंवा पदविका देण्याकरिता मंडळाला शिफारस करील.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ मध्ये कलम ३४अ समाविष्ट करणे.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ नंतर, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

स्वायत्त दर्जा काढून घेणे.

" **३४अ.** (१) मंडळ, तक्रार प्राप्त झाल्यानंतर किंवा स्वाधिकारे चौकशी केल्यानंतर, स्वायत्त दर्जा प्रदान केलेल्या संस्था कलमे ३३ व ३४ मधील तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर करीत असल्याची खात्री पटल्यास, ते, संस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याची शासनास शिफारस करेलः

परंतु, संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय, मंडळ, संस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याची शिफारस शासनास, करणार नाही.

(२) मंडळाकडून, संस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेण्याची शिफारस प्राप्त झाल्यावर, शासन, अशा संस्थेचा स्वायत्त दर्जा काढून घेईल. या बाबतीत शासनाचा निर्णय हा अंतिम आणि बंधनकारक असेल. " .

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याचे कलम ३५ बदली दाखल करणे.

“ **३५.** (१) शासनाच्या आणि संस्था सुरू करण्यासाठी परवानगी देणाऱ्या इतर नियामक प्राधिकरणाच्या, पूर्वपरवानगीखेरीज संस्थेच्या व्यवस्थापनाला, संस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही. संस्था बंद करणे.

(२) संस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, मंडळाकडून, किंवा, यथास्थिति, उचित नियामक प्राधिकरणाकडून, घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार, संस्था बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या रूपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मूल्य आणि त्यास शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा अभिकरणाकडून त्यावेळेपर्यंत मिळालेली अनुदाने, यांचा निर्देश करून मंडळाकडे, अर्ज करील :

परंतु, विनाअनुदानित संस्थेचे व्यवस्थापन, संस्था बंद करण्यातून निर्माण होणारे दायित्व, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देय वित्तलब्धींसह, केवळ अशा संस्थेच्या व्यवस्थापनाचेच असेल, अशी हमी शपथपत्रावर देईल.

(३) असा अर्ज मिळाल्यावर ती संस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे मूल्यमापन करण्यासाठी व ते ठरविण्यासाठी मंडळ त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील :

परंतु, व्यवस्थापनाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय, मंडळाकडून संस्था बंद करण्याचा असा अर्ज फेटाळण्यात येणार नाही.

(४) मंडळाने संस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास ते, शासन किंवा इतर सार्वजनिक वित्त पुरवठा संस्था यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या निधींचा वापर करून निर्माण करण्यात आलेल्या शासनाकडे हस्तांतरित करावयाच्या मत्तांचा अहवाल तयार करेल आणि तो शासनाला व जेथे आवश्यक असेल तेथे नियामक प्राधिकरणालादेखील सादर करील.

(५) मंडळाने, संस्था बंद करण्याची शिफारस केली असेल आणि संस्था सुरू करण्यासाठी ज्या नियामक प्राधिकरणाने परवानगी दिली आहे त्या नियामक प्राधिकरणाकडून संस्था बंद करण्यासाठी पूर्व परवानगी मिळाली असेल तर, शासनास, ती बंद करण्याचे आदेश देता येतील.

(६) पोट-कलमे (१) ते (५) मध्ये दिलेली कार्यपद्धती ही, मंडळाला संलग्न असलेला पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम बंद करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात येईल.”.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ यात कलम ३५अ समाविष्ट करणे.

“ **३५अ.** (१) संस्थेच्या व्यवस्थापनाच्या बदलाकरिता किंवा हस्तांतरणाकरिता शासनाची परवानगी मागणारे व्यवस्थापन, मंडळाने किंवा, यथास्थिति, नियामक प्राधिकरणाने, घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार मंडळाच्या सचिवाला, मंडळाद्वारे किंवा, यथास्थिति, नियामक प्राधिकरणाद्वारे विहित करण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज करील. संस्थेच्या व्यवस्थापनातील बदल किंवा हस्तांतरण.

(२) वेळापत्रकामध्ये निर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते उक्त वेळापत्रकामध्ये निर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, शासनाला व जेथे आवश्यक असेल तेथे नियामक प्राधिकरणाला देखील पाठविण्यात येतील.

(३) शासनास, परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता विचारात घेऊन, त्याच्या पूर्ण स्वेच्छाधिकारामध्ये त्यास योग्य व उचित वाटतील अशा संस्थांना परवानगी देता येईल.”.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (४) मंडळाला, विशिष्ट उद्दिष्टांकरिता जसे की, विद्यार्थी विकास कार्यक्रम, विद्यार्थी शिष्यवृत्ती, प्रकल्प स्पर्धा, नवोपक्रम व नवसंशोधन उपक्रम, पायाभूत विकास सुविधा, कर्मचारी वेतन संरक्षण निधी आणि कौशल्य केंद्र व उत्कृष्टता केंद्र यांची स्थापना व विकास किंवा कोणत्याही अन्य उद्दिष्टांकरिता चालू वर्षातील निधीमधून किंवा मागील वर्षाच्या संचित शिलकीमधून निधी राखून ठेवणे, सुरू ठेवण्याचा किंवा नव्याने राखून ठेवण्याचा अधिकार असेल.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याचे कलम ३८ बदली दाखल करणे.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

निधीचा वापर.

" **३८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळाच्या निधीचा वापर, या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबधित आकार व शुल्कांचे प्रदान करण्यासाठी आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अधिकार प्रदान करण्यात आले असतील किंवा कर्तव्ये सोपविण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी, करता येईल.

(२) कलम ३७ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निधीतील जमा व संचित विचारात घेतल्यानंतर, निधीमधील संचित शिलकीचा भाग, नियामक परिषदेच्या पूर्व मंजुरीने, पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांकरिता, वेळोवेळी, मंडळाला वापरता येईल :—

(एक) मंडळाच्या मालमत्तांचा विकास करणे आणि मंडळाच्या प्रयोजनांसाठी जंगम व स्थावर मालमत्ता संपादित करणे ;

(दोन) मंडळासाठी इमारतींचे बांधकाम करणे ;

(तीन) आदर्श तंत्रनिकेतन किंवा उत्कृष्टता केंद्र म्हणून शासकीय तंत्रनिकेतनचे व्यवस्थापन करणे अथवा शासकीय तंत्रनिकेतनांमधील निर्दिष्ट प्रयोगशाळांची दर्जावाढ करणे :

परंतु, उपरोक्त प्रयोजनासाठी कोणत्याही वित्तीय वर्षामधील निधींचा वापर, पूर्ववर्ती वित्तीय वर्षाच्या अखेरीस पायाभूत विकास सुविधेसाठी राखून ठेवलेल्या निधींमधील शिलकीच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा पंचवीस टक्के रकमेच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम ही, त्या वित्तीय वर्षात एकाच प्रकल्पावर वापरली जाणार नाही.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ४६ ची सुधारणा.

**२३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मधील, पोट-कलम (३) वगळण्यात येईल.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ४७ ची सुधारणा.

**२४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४७ मधील, पोट-कलम (१) वगळण्यात येईल.

**२५.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :— सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ यामध्ये अनुसूची बदली दाखल करणे.

## " अनुसूची

## प्रदेश

( कलम २ (जे) पहा )

| अ. क्र. | प्रदेश | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | अमरावती | अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम व यवतमाळ. |
| २ | छत्रपती संभाजीनगर | बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड व परभणी. |
| ३ | मुंबई | मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे. |
| ४ | नागपूर | भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व वर्धा. |
| ५ | नाशिक | अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदूरबार व नाशिक. |
| ६ | पुणे | कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा व सोलापूर.". |

**२६.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात पदविका स्तरीय तंत्र शिक्षणाशी संबंधित बाबी विनियमित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ स्थापन करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ (१९९७ चा महा. ३८) अधिनियमित करण्यात आला आहे.

२. शीघ्रगतीने बदलणारे तंत्रज्ञान आणि उद्योगांच्या अपेक्षा यामुळे, पदविका स्तरीय तंत्रशिक्षणाचे नियमन करण्यासाठी आवश्यक ते बदल केले जात आहेत.

नवीन संस्था सुरू करणे व बंद करणे, संलग्नीकरण, संलग्नीकरणाच्या अटी, संलग्नीकरण काढून घेणे, स्वायत्त दर्जा कायम करणे इत्यादीसाठीच्या परवानगीशी संबंधित कार्यपद्धती सुव्यवस्थित करण्यासाठी, सुधारणा करणे आवश्यक आहे. सध्या मंडळाची, मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर अशी चार विभागीय कार्यालये आहेत. मंडळाच्या कामात वाढ झाली असल्याने, मंडळाच्या प्रभावी कामकाजासाठी नाशिक आणि अमरावती येथे विभागीय कार्यालयाची मंडळास आवश्यकता आहे. वरील बाबी लक्षात घेता, उक्त अधिनियमात आवश्यक विवक्षित सुधारणा करणे शासनास आवश्यक वाटते.

३. उक्त अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) मंडळाच्या उद्दिष्टांची तरतूद करणे ;

(ख) अद्ययावत सुविधांसह आदर्श तंत्रनिकेतने किंवा उत्कृष्टता केंद्रे म्हणून शासकीय तंत्रनिकेतनांची दर्जावाढ करण्यासाठी तरतूद करणे;

(ग) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) खालील, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या धर्तीवर मंडळाशी संलग्न संस्थांमधील पदविका स्तरावरील तंत्र शिक्षण पाठ्यक्रमांच्या शुल्क निश्चितीसाठी शुल्क निश्चिती समितीची तरतूद करणे ;

(घ) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने किंवा भारतीय औषधनिर्माण परिषदेने किंवा राज्य शासनाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संस्था सुरू करण्यासाठीच्या आणि बंद करण्यासाठीच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(ङ) तंत्रनिकेतन किंवा संस्था व त्यातील अभ्यास पाठ्यक्रम यांच्या संलग्नीकरणाच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे;

(च) संस्थांच्या शैक्षणिक कामगिरीच्या आधारावर स्वायत्त दर्जा प्रदान करणे किंवा तो काढून घेणे;

(छ) संस्थेचे व्यवस्थापन बदलणे किंवा हस्तांतरित करणे यासाठी तरतुदी करणे.

**४.** वरील उद्दिष्ट्ये साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २० मार्च, २०२३.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकामध्ये, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड २६.**—या खंडांन्वये, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीमध्ये या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात येताना जी अडचण उद्‌भवेल ती दूर करण्यासाठी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधातील उपरोल्लिखित प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

**सन २०२३ चे वि.स. विधेयक क्र. १५—महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२३.**

(महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ मधील उतारे)

(सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.)

**महाराष्ट्र राज्यामधील पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाशी संबंधित बाबींचे नियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यामधील पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाशी संबंधित बाबींचे नियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना करण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या त्यांच्याशी संबंधित इतर बाबींची तरतूद करणे इष्ट आहे.

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** **** **** ****

**२.** (क) ते (ग) **** **** **** व्याख्या.

(घ) " पदविका स्तरावरील तंत्र शिक्षण " याचा अर्थ पदविका किंवा पदविकेत्तर किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका स्तरावरील अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र किंवा व्यवस्थापन शिक्षण आणि मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेले इतर शिक्षण संपादन करण्यासाठी, यथास्थिति, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र पदविका यांच्यानंतरचे असेल असे तंत्र अभियांत्रकी शिक्षण किंवा मंडळाने विनिर्दिष्ट केलेले कोणतेही अन्य शिक्षण, असा आहे ;

(घ-क) ते (झ) **** **** ****

(ञ) " प्रदेश " याचा अर्थ, या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तीन प्रदेशांतील प्रत्येक प्रदेशात समाविष्ट असणारे क्षेत्र असा आहे.

(ट) ते (ठ) **** **** ****

**३.** व **४.** **** **** ****

**५.** (१) मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :— मंडळाची रचना करणे.

(क) **** **** ****

(ख) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, सदस्य सचिव ; आणि

(ग) पुढील सदस्य म्हणजे :—

**वर्ग अ-पदसिद्ध सदस्य**

(एक) व (दोन) **** **** ****

(तीन) राष्ट्रीय तांत्रिक मनुष्यबळ माहिती यंत्रणेच्या राज्य मध्यवर्ती (नोडल) केंद्राचा एका प्रतिनिधी ;

(चार) **** **** ****

(पाच) संचालक, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण मंडळ (पश्चिम विभाग), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय ;

(सहा) **** **** ****

**वर्ग ब-नामनिर्देशित सदस्य**

(एक) ते (तीन) **** **** ****

(चार) प्रत्येक महसूल प्रदेशातून आळीपाळीने एक याप्रमाणे, व्यावसायिक संस्थांमधून शासनाने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य ;

(पाच) लघु उद्योग, माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, मौल्यावान खडे व जडजवाहीर, औषधीनिर्मानशाळा आणि हॉटेल व्यवस्थापन या क्षेत्रांतील उद्योजक असलेले उद्योग संघातून शासनाने नामनिर्देशित करावयाचे सहा सदस्यांपैकी किमान दोन सदस्य मुंबई व पुणे प्रदेशाबाहेरील असतील ;

परंतु एखाद्या व्यक्तीची अशाप्रकारे नियुक्ती ही, ज्याच्या आधारे झाली असेल ते पद पदनाम किंवा यथास्थिती हुद्दा धारण करण्याचे बंद होताच ती व्यक्ती मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी व्यक्ती, तेव्हांपासून एका आठवड्याच्या आत आपण मंडलाचा सदस्य असणे बंद झाल्याचे अध्यक्षाला लेखी कळवील.

(२) व (३) **** **** ****

संचालकांची नियुक्ती व पदावधी आणि सेवेच्या शर्ती.

**६.** (१) मंडळाचा एक संचालक असेल ; त्याची नियुक्ती, शासन सहसंचालक किंवा त्याच्याशी समतुल्य पदाचा, दोन वर्षापेक्षा कमी नसेल एवढा किमान अनुभव असलेला शासनाच्या तंत्र शिक्षण सहसंचालकांमधून करील.

(२) ते (६) **** **** ****

**७.** ते **१९.** **** **** ****

सचिव, सहसचिव. उप सचिव, सहायक सचिव, परीक्षा नियंत्रक, पद्धती विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये.

**२०.** (१) **** **** ****

(२) अध्यक्षांच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, सचिव हा मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल आणि त्या त्या वेळी मंडळाच्या नियंत्रणाखाली सेवा करीत असलेले इतर सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे सचिवाच्या हाताखाली असतील.

(३) ते (७) **** **** ****

**२१.** व **२१ क.** **** **** ****

मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

**२२.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनेतने, मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) ते (य) **** **** ****

(यक) ते (यञ) **** **** ****

(यञ) (एक) मंडळाच्या कार्यालयांचे कामकाज,

(दोन) प्रादेशिक कार्यालयाचे कामकाज.

(तीन) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना निवासी जागा पुरविणे, यासाठी आवश्यक असलेली कोणतीही मालमत्ता किंवा पायाभूत सुविधा निर्माण करणे, तीवर मालकी तत्त्वावर घेणे, ती धारण करणे किंवा भाड्याने देणे.

(यट) ते (यड) **** **** ****

**२३. व २४.** **** **** ****

संलग्नीकरणाच्या शर्ती.

**२५.** (१) संलग्नीकरणासाठी अर्ज करणारे व्यवस्थापन आणि ज्याच्या संस्थेला विनिर्दिष्ट कलावधीसाठी संलग्नीकरण प्रदान करण्यात आले आहे असे व्यवस्थापन पुढील हमी देईल आणि तिचे अनुपालन करील,—

(क) ते (ड) **** **** ****

(च) मान्यताप्राप्त संलगन संस्था यांच्या अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न संस्थांच्या कर्माचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वित्तलब्धी या मंडळाने विहित केल्याप्रमाणे असतील आणि अभ्यासक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षनतेने चालण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;

(छ) **** **** ****

(ज) अधिनियमाच्या किंवा विनिमय यांच्या तरतुदींअन्वये मंडळाचे अध्यक्ष, आणि इतर अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात येईल ;

(झ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये बदल किंवा त्यांचे स्थानांतरण करण्यात येणार नाही ;

(ञ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय, संस्था बंद करण्यात येणार नाही ;

(ट) **** **** ****

(२) दुसऱ्या मंडळाचा भाग असलेल्या संस्थेचे संलग्नीकरण मूळ मंडळाकडून " ना हरकत प्रमाणपत्र " मिळाल्याशिवाय केले जाणार नाही.

**२६.** (१) व (२) **** **** **** परवानगी संबंधीची कार्यपद्धती.

(३) नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणार व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी मंडळाच्या सदस्य सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(४) पूर्वोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी शासनाकडे पाठवण्यात येतील.

(५) शासन, मंडळाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी त्याला त्याच्या निरपवाद स्वेच्छेनिर्णयानुसार उचित व योग्य वाटतील अशा संस्थांना परवानगी देऊ शकेल व तसे करताना ते शासनाची अर्थसंकल्पीय साधनसंपत्ती, नवीन संस्था सुरू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनांची योग्यायोग्यता आणि तंत्र शिक्षणाच्या संस्थांच्या स्थाननिश्चयनासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम विचारात घेईल ;

परंतु असे की, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून शासन तंत्र शिक्षणाची नवीन संस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, मंडळाने शिफारस न केलेल्या अशा कोणत्याही अर्जाला मान्यता देऊ शकेल.

(६) **** **** ****

**२७.** (१) कलम २६ अन्वये शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर मंडळ पोट-कलम (२) मध्ये दिलेल्या विहित कार्यपद्धतीचे अनुसरण करून आणि नवीव संस्थेने ठरलेल्या शर्तींचे पालन केलेले आहे काय आणि कोणत्याही मर्यादेपर्यंत पालन केलेले आहे ते विचारात घेल्यानंतर, त्या संस्थेला पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्याबाबत, विचार करील. या संबंधातील मंडळाचा निर्णय अंतिम असेल. संलग्नीकरण कार्यपद्धती.

(२) ते (४) **** **** ****

(५) कलम २६ मध्ये निर्देशिलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषयक आणि जादा तुकड्या सुरू करण्यासंबंधीच्या परवानगीच्या बाबतीत लागू होईल ;

(६) ते (७) **** **** ****

**२८.** ते **३१.** **** **** ****

**३२.** (१) **** **** **** संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे.

(२) मंडळ, उपरोल्लिखित कार्यवाही करण्याचे त्याने का योजले आहे याबद्दलच्या कारणांचा उल्लेख करील व नोटिशीची एक प्रत प्राचार्य किंवा संस्थेचा प्रमुख यांच्याकडे पाठवील. मंडळ, नोटिशीच्या उत्तरादाखल व्यवस्थापनाने किती मुदतीत आपले लेखी निवेदन सादर केले पाहिजे ती मुदतही त्या नोटीशीत विनिर्दिष्ट करील ; ही मुदत तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही.

(३) **** **** ****

(४) मंडळ, संस्थेमधील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, शासनाकडे, या बाबतीत करावयाच्या कार्यवाहीची शिफारस करील आणि त्यानंतर शासन, त्या शिफारशाची अंमलबजावणी करील.

स्वायत्त दर्जा प्रदान करणे.

**३३.** (१) व (२) **** **** ****

(३) स्थानिक चौकशी, निकषाच्या मुद्यावर आणि प्रमाणके विनिर्दिष्ट केलेली असतील त्या बाबतीत त्या प्रमाणकानुसार सुविधा अस्तित्वात आहेत काय ते पाहण्यासाठी व समितीला आवश्यक वाटेल अशा अधिक माहितीसाठी करण्यात येईल.

(४) ते (८) **** **** ****

**३४.** **** **** ****

संस्था बंद करणे.

**३५.** (१) शासनाच्या पूर्वपरवानगीखेरीज संस्थेच्या व्यवस्थापनाला संस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(२) संस्था बंद करून इच्छिणारे व्यवस्थापन आधीच्या वर्षाच्या १ एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवशी संस्था बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या स्वरूपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मूल्य आणि त्यास शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा संस्थांकडून वेळेपर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून मंडळाकडे अर्ज करील.

(३) असा अर्ज मिळाल्यावर ती संस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे मूल्यमापन करण्यासाठी व ते ठरविण्यासाठी मंडळ, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील. आवश्यक ते सहाय देऊन किंवा शासनाने संस्था ताब्यात घेऊन किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करून संस्था बंद करण्याची बाब टाळता येईल किंवा कसे याचीही तपासणी मंडळास करता येईल.

(४) मंडळाने संस्था बंद करणयाची शिफारस करण्याचे ठरविल्यास ते मंडळ, व्यवस्थापनाकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या किंवा भरपाईच्या रकमेचे प्रमाण, शासन किंवा इतर सार्वजनिक वित्तपुरवठा संस्था यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या पैशाचा वापर करून निर्माण करण्यात आलेल्या मत्ता शासनाकडे किंवा इतर व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किवा कसे व कमी करण्यात आलेले अध्यापक व कर्मचारी वर्ग यांना द्यावयाची भरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व तो शासनाला सादर करील.

(५) मंडळाने, संलग्न संस्था बंद करण्याची शिफारस केली असेल तर, शासन, ते बंद करण्याचे आदेश देऊ शकेल.

(६) शासन, ती संस्था ताब्यात घेण्याचे किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरीत करण्याचे ठरवील तर त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ही, शासन विहित करील त्याप्रमाणे असेल.

(७) संस्थेत आधीच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने, संस्था बंद करण्याची पद्धती टप्पा टप्प्याने करण्यात येईल व पहिल्या वर्षाचे वर्ग प्रथम बंद करण्यात येतील आणि कोणालाही नव्याने प्रवेश दिला जाणार नाही. संस्था टप्पा टप्प्याने बंद करण्याची पद्धती ही शासनाने विहित केल्याप्रमाणे असेल.

**३६.** व **३७.** **** **** ****

निधीचा सर्वसाधारण वाप.

**३८.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळाच्या निधीचा वापर या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबीशी संबंधित आकार व खर्च देण्यासाठी आणि मंडळाला ज्या प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अधिकार प्रदान करण्यात आले असतील व मंडळावर कर्तव्ये सोपवण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठीच केवळ करण्यात येईल.

**३९.** व **४५.** **** **** ****

विनियम करण्याचा मंडळाचा अधिकार.

**४६.** (१) व (२) **** **** ****

(३) या कलमान्वये तयार करण्यात आलेले विनियम, शासनाच्या मंजुरीशिवाय अंमलात येणार नाहीत.

पहिले विनियम.

**४७.** (१) कलम ४६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पहिले विनियम हे, शासन तयार करील आणि मंडळाकडून नवीन विनियम रीतसर तयार करण्यात येईतोपर्यंत ते अंमात राहील.

(२) **** **** ****

**४८.** व **५४.** **** **** ****

# अनुसूची

## प्रदेश

**(कलम २ (ञ) पहा)**

| | प्रदेश | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | अहमदनगर, औरंगाबाद, बीड, धुळे, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद आणि परभणी. |
| २ | नागपूर | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ. |
| ३ | पुणे | कोल्हापूर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५.]**

**[ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७
यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी
संमत केल्याप्रमाणे. ]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.